**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:12.03.2026** **वार: गुरुवार**

---

1. जल संवर्धन हे प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य- राष्ट्रपतींचं प्रतिपादन
2. सर्वोच्च न्यायालयाची प्रथमच सकारात्मक इच्छामरणाला परवानगी
3. राज्यात हरित उर्जा साठवणुकीसाठी गुंतवणूक
4. विधीमंडळात महिला शेतकऱ्यांचं सक्षमीकरण या विषयावर विशेष चर्चासत्र आणि
5. राज्यात बऱ्याच ठिकाणी कमाल तापमानानं पस्तीशी ओलांडली, नागरिकांनी काळजी घेण्याचं प्रशासनाचं आवाहन

**राष्ट्रपती-जलशक्ती**

जल संवर्धन हे प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. जल महोत्सवाअंतर्गत नवी दिल्लीत आयोजित राष्ट्रीय कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. पाण्याचं मोल जाणून हा खजिना भविष्यातल्या पिढ्यांसाठी सांभाळून ठेवला पाहिजे असं राष्ट्रपती म्हणाल्या.....

**हमें जल को केवल उपयोग की वस्तु के रूप में नहीं देखना चाहिए। कहा जाता है कि जल है तो कल है अपने भविष्य को सुरक्षित करने के लिए हमें जल संरक्षण को अपने व्यवहार का विभिन्न हिस्सा बनाना चाहिए। यह का विषय है कि 8 मार्च से 22 मार्च तक आयोजित किए जा रहे जल महोत्सव के दौरान विभिन्न गतिविधियों के माध्यम से लोगों को जल के महत्व के बारे में जागरूकता किया जा रहा है।**

देशभरात ८ मार्चपासून सुरू झालेला हा जल महोत्सव 22 मार्चपर्यंत चालेल.

**सर्वोच्चन्यायालय-इच्छामरण**

सर्वोच्च न्यायालयानं काल प्रथमच सकारात्मक इच्छामरणाला परवानगी देण्याचा निर्णय घेतला. गेल्या बारा वर्षांपासून कोमात असलेल्या 32 वर्षीय तरुणाची जीवरक्षक प्रणाली काढून घेण्याला न्यायालयानं परवानगी दिली. गाझियाबादमधील हा तरुण 2013 मध्ये चौथ्या मजल्यावरुन खाली पडल्यामुळं त्याच्या डोक्याला गंभीर इजा झाली होती. तेव्हापासून तो बेशुद्धावस्थेत होता. वैद्यकीय पथकानं तो बरा होण्याची काहीच शक्यता नसल्याचा अहवाल दिला होता.

**विधीमंडळ-मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर दिलं. राज्यावरचं कर्ज वाढलं असलं तरी ते स्थूल राज्यांतर्गत उत्पादनाच्या 25 टक्क्यांच्या आत असणं आवश्यक असतं, आणि महाराष्ट्रावरचं कर्ज 18 टक्के आहे असं त्यांनी सांगितलं. राज्याच्या आर्थिक शिस्तीबाबत मुख्यमंत्री म्हणाले.....

**मला या निमित्ताने केवळ एवढच सांगायच आहे की या अर्थसंकल्पाच्या माध्यमातनं, राज्याला पुढे नेण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. राज्य पुढे जाण्याकरता सर्वांचच समर्थन हे अत्यंत आवश्यक आहे. राज्यासमोर अडचणी आहेत. पुढे देखील येणार आहेत. पण तरी देखील मी सांगतो की या सगळ्या अडचणीत मी असं**

म्हणत नाही की राज्य खूप श्रीमंत आहे. राज्याची परिस्थिती खूप चांगली आहे. पण अडचणीच्या स्थितीतही मार्ग काढण्याची क्षमता या महाराष्ट्राकडे आहे. आणि म्हणूनच आजही देशाच्या इतर राज्यांच्या तुलनेत आर्थिक शिस्त पाळणार राज्य म्हणून या महाराष्ट्राकडे पाहिलं जात. आणि विशेषतः ज्याचा मी उल्लेख केला की आमचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांनी सातत्याने या राज्यामध्ये आर्थिक शिस्त पाळली आणि हा अर्थसंकल्प मांडताना, मी देखील त्याच पद्धतीनं त्यांच्याच पद्धतीनं आर्थिक शिस्त पाळत हा अर्थसंकल्प मांडला आहे. पण शिस्त पाळत असताना कुठल्याही प्रकारे महत्वाच्या गोष्टींवर कमतरता होणार नाही. असा मी आपल्या सर्वांना या ठिकाणी आश्वासित करतो.

राज्याच्या हरित उर्जा धोरणाविषयी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.....

महाराष्ट्राने नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जा साठवणूक धोरण दोन हजार पंचवीस ते पस्तीस केलेलं आहे या धोरणाप्रमाणे दोन हजार तीस साली बावन्न टक्के ऊर्जा ही अपारंपरिक स्त्रोतांनी येईल आणि दोन हजार पस्तीस साली पासष्ठ टक्के आपली ऊर्जा ही अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतातून येईल हरित ऊर्जा ही ट्वेंटी फोर बाय सेवन नसते आणि म्हणून ही आपण या ठिकाणी बॅटरी क्षमता निर्माण करतो आहोत आणि याकरता मोठ्या प्रमाणात आपण अर्थसंकल्पीय गुंतवणूक करतो आहोत आणि खाजगी गुंतवणूक देखील आणतो आहोत आणि त्यातनं मोठ्या प्रमाणात आपल्या राज्यामध्ये विजेची उपलब्धता होईल.

राज्य दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत देशात पाचव्या क्रमांकावरआहे, मात्र राज्याच्या जीडीपी वाढीचा दर देशाच्या जीडीपी वाढीच्या दरापेक्षाजास्तआहे, असं त्यांनी सांगितलं.
भांडवली खर्च 2 लाख कोटींपर्यंत पोहोचला आहे, ज्या तुलनेनं कर्ज वाढलंय त्याच्या कितीतरी पट अधिक भांडवली गुंतवणूक वाढली आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

जमीन मोजणी प्रक्रियेचा कालावधी 2 ते 3 महिन्यांवरुन एका महिन्यावर आणला जाईल, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखऱ बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. दीडहजार नवीन रोव्हर मशीनद्वारे मोजणी केली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. भूमी अभिलेख विभागातली रिक्त पदं भरण्यासाठी विशेष मोहीम राबवणार असून उपअधीक्षकाची पदं तीन महिन्यांच्या आत भरली जातील अशी माहिती त्यांनी दिली.

एसटी महामंडळात चालक आणि वाहक या पदांसाठी 17 हजार 642 कर्मचाऱ्यांच्या भरतीच्या प्रस्तावाला राज्य शासनानं मंजुरी दिल्यानंतर ताबडतोब ही मेगाभरती होईल, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

**बीपीसीएल**

सरकार स्वयंपाकाच्या गॅसची आयात सुरळीत आणि मुक्तपणे पार पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे असं भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडनं म्हटलं आहे. सध्याच्या भू-राजकीय परिस्थिती आणि एलपीजी आयातीवर परिणाम करणाऱ्या नाकाबंदीमुळे, व्यापक वितरण सुनिश्चित करण्यासाठी उपलब्ध पुरवठ्याचं काळजीपूर्वक रेशनिंग

केलं जात आहे. एलपीजी सिलिंडरच्या वाटपात घरगुती पुरवठ्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलं आहे.

**<u>विधीमंडळ-महिला दिन</u>**

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष आणि जागतिक महिला दिनाचं औचित्य साधून राज्य शासन तसंच विधानमंडळानं महिला शेतकऱ्यांचं सक्षमीकरण या विषयावर विशेष चर्चासत्र आयोजित केलं होतं. सर्वपक्षीय महिला आमदार आणि  तज्ज्ञ या चर्चासत्रात सहभागी झाले होते.
महिला शेतकऱ्यांना त्यांचे हक्क आणि सन्मान मिळवून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचं सांगताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या.....

**महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी आम्ही पुढील अधिवेशनामध्ये त्यासाठी खास विधेयकाचा विचार करत आहोत कृषी क्षेत्राच्या संख्या आकडेवारीमध्ये यापुढे स्त्री आणि पुरुष शेतकऱ्यांची वेगवेगळी नोंद घेतली जाईल त्यामुळे या माहितीच्या आधारे निर्णय घेणं अधिक प्रभावी योजना कार्यान्वित करणं सोपं जाईल केंद्राच्या धर्तीवरच आपल्या राज्यात देखील राज्यस्तरीय जेंडर रिसोर्स सेंटर स्थापन करण्यात येईल.**

राज्याच्या महिला धोरणात शेतीतील महिलांच्या सक्षमीकरणाचा विचार करण्यात आला आहे असं विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यावेळी म्हणाल्या.

शेती क्षेत्रातलं महिलांचं वाढतं योगदान लक्षात घेऊन त्यांना नवतंत्रज्ञानाचं पाठबळ देण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे महिला

शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाच्या उपयोगाद्वारे शेतीतून आर्थिक उन्नती साधता येईल असा विश्वास महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.
महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या सहाय्यासाठी विशेष 'कृषी विकास निधी' स्थापन करावा, अशी मागणी एम. एस स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या नित्या राव यांनी यावेळी केली.

**गृहराज्यमंत्री**

नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करताना वस्तुस्थितीदर्शक माहितीच्या आधारे सुधारित प्रस्ताव सादर करावे असे निर्देश ग्रामीण विभाग गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिले आहेत. मंत्रालयात भोयर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीचा आढावा घेण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. तंत्रज्ञानाचा समाजात मोठ्या प्रमाणात झालेला प्रसार आणि वाढता वापर, त्या माध्यमातून होणारे आर्थिक फसवणुकीचे गुन्हे यांचा नवीन पोलीस ठाणे निर्मितीबाबतच्या प्रस्तावात विचार केला जावा असं त्यांनी सांगितलं.

**आरोग्यत पासणी-नवीमुंबई**

स्वच्छ भारत मिशनच्या वतीनं जागतिक महिला दिनानिमित्त महिला-केंद्रीत स्वच्छता विषयक उपक्रम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेनं काल महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केलं होतं. यामध्ये साडेचारशे पेक्षा अधिक महिला स्वच्छताकर्मींची आरोग्य तपासणी करुन त्यांना आवश्यकतेनुसार औषधं देण्यात आली.  यावेळी

आयोजित रक्तदान शिबीरात महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी रक्तदान केलं.

**<u>अनुदान-जळगांव</u>**

सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाचा वापर वाढवून पाण्याची बचत करत शेतीउत्पादनात वाढ करण्याच्या उद्देशाने राज्यात 'प्रति थेंबअधिक पीक' योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी जळगांव जिल्ह्याला 36 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ठिबक आणि तुषार सिंचन संचांचा वापर वाढवणे, पाण्याचा कार्यक्षम वापर करणं आणि कमी पाण्यात

जास्त उत्पादन घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करणं हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

पुणे शहर तसंच जिल्ह्यात सध्या तापमानात सातत्यानं वाढ होत असून उष्णतेच्या लाटेची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्वतःच्या आणि कुटुंबियांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणं गरजेचं आहे. उष्माघात टाळण्यासाठी आरोग्य विभागानं मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. गुरांना छावणीत ठेवा, त्यांना हिरवा चारा आणि पुरेसं पाणी उपलब्ध करून द्या. कामाच्या ठिकाणी थंड पाण्याची सोय करा असं या सूचनांमध्ये म्हटलं आहे. या सूचनांचं पालन करण्याचं आवाहन करताना पुणे उपजिल्हारुग्णालयाचे अधिकारी रमेश पवार म्हणाले.....

**पाणीचं सेवन लहान मुलं जनरली करत नाहीत वयस्कर जे आहेत ते पण थोडं घरात राहतात कमी फिरतात, त्यांना वाटतं की आपण घरीच आहोत परंतु पाण्याचं सेवन हे अत्यंत करणं गरजेचं**

**आहे आणि शक्यतो ओआरएस चं पाणी पिणं किंवा साखर मीठ पाणी आणि शक्य असेल तर नारळचं पाणी हे पिणं पण थोडं गरजेचं आहे इलेक्ट्रोलाइट जो इम्बॅलन्स होतो तो होणार नाही याने आणि जे सोडियम ची कमतरता वगैरे होतो वयस्कर लोकांमध्ये ती पण होणार नाही.**

**हवामान**

विदर्भात बऱ्याच ठिकाणी कमाल तापमानानं 40 अंश सेल्सिअसची पातळी गाठली आहे. उद्या विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**